**नमुना दोन (३:१ मान्यता)**

जा.क्र.जिपऔ/शिक्षण/प्रावि-३/२०२१-२२/ 1465
कार्यालय जिल्हा परिषद औरंगाबाद
दिनांक :- 13/8/२०२१

व्यवस्थापक :अध्यक्ष/सचिव,
**पर्ल एज्युकेशन ॲण्ड वेलफेअर सोसायटी, औरंगाबाद संचलित,**
**पिरॅमिड इंटरनॅशनल स्कूल, गट नं. २३३, हर्सुल, जि. औरंगाबाद.**

| | |
|---|---|
| विषयः- | **बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम,२००९ यांच्या कलम १८ च्या प्रयोजनार्थ,बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम, २०११ याच्या नियम ११, पोट नियम (४) व माध्यमिक शाळा संहिता नियम ३:१ अन्वये शाळा मान्यता प्रमाणपत्र बाबत...** |
| संदर्भः- | १)शासन मान्यता संकिर्ण-१९०९/प्र.क्रं.४३१/प्रा.शि-३ मंत्रालय मुंबई-३२ दिनांक २०आक्टोंबर २००९<br>२) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यीत शाळा ( स्थापना व विनियम (महाराष्ट्र शासन असाधारण क्रं. ४,६, व २४) २०१२.<br>३) महाराष्ट्र शासनाचे शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांचा शासन निर्णय क्रमांकएसएफएस-१०१९/ प्र.क्र. १०८४/ एसएम-२ एसएम-२ मंत्रालय मुंबई-३२ दिनांक २०/०९/२०१९<br>४) विभागीय शिक्षण उपसंचालक औरंगाबाद यांचे आदेश जां.क्र./शिउस/ स्वयंअ/ एमसीएन/ मावि-१ /२०२०-२१/ ६७३ दिनांक २९/०१/२०२१<br>५) अध्यक्ष / सचिव, पर्ल एज्युकेशन ॲण्ड वेलफेअर सोसायटी, औरंगाबाद यांचा प्रस्ताव<br>५) गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, औरंगाबाद यांचा तपासणी अहवाल |

महोदय,

आपल्या अर्जाच्या संदर्भात आणि त्यानंतर यासंदर्भात शाळेशी केलेला पत्रव्यवहार/शाळेची केलेली तपासणी या आधारे. मी शिक्षणाधिकारी (प्राथ) जिल्हा परिषद औरंगाबाद,**पर्ल एज्युकेशन ॲण्ड वेलफेअर सोसायटी, औरंगाबाद संचलित, पिरॅमिड इंटरनॅशनल स्कूल, गट नं. २३३, हर्सुल, जि. औरंगाबाद** या **इंग्रजी माध्यमाच्या नवीन प्राथमिक (१ ली ते १२ वी)** या शाळेस सन २०१९-२० पासुन स्वयं अर्थसहाय्यित तत्वावर संदर्भीय शासन निर्णय,आदेश व तपासणी अहवालच्या अधीन महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०११ मधील कलम ४ नुसार **इयत्ता १ ली ते ८ वी** च्या वर्गास दिनांक **३१ मार्च-२०२२** पर्यंत मान्यता देण्यात येत आहे.

**वरील मान्यता ही खालील शर्तीच्या पूर्ततेच्या अधीन आहे.**

१. बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम,२००९ (जोडपत्र एक) आणि महाराष्ट्र बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम,२०११ (जोडपत्र दोन) मधील तरतुदीचे, शाळा पालन करील.
२. शाळा नजीकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालकांना,पहिल्या इयत्तेतील विद्यार्थी संख्येच्या किमान २५ % मर्यादेपर्यंत प्रवेश देईल आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल परंतु आणखी असे की,पूर्व प्राथमिक इयत्तांच्या बाबतीतदेखील या प्रमाणकाचे अनुपालन करण्यात येईल.
३. परिच्छेद ३ निर्दिष्ट केलेल्या बालकांकरिता शाळेला अधिनियमाच्या कलम १२(२) नुसार प्रतिपूर्ती मिळेल,अशी परिपूर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बँक खाते देण्यात येईल.
४. संस्था/शाळा कोणतीही कॅपिटेशन फी वसूल करणार नाही आणि कोणत्याही छाननी पध्दतीसाठी बालकांस किंवा त्यांच्या मात्या-पित्यास किंवा पालकास भाग पाडणार नाही.
५. कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्याच्या अभावी, धर्म, जात किंवा वंश, जन्मठिकाण किंवा यांपैकी कोणत्याही कारणास्तव, शाळेमध्ये प्रवेश नाकारण्यात येणार नाही.
६. (एक) शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास तो ज्या इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखून ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत शाळेतून काढून टाकण्यात येणार नाही.
(दोन)कोणत्याही बालकास शारीरिक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.
(तीन)कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत कोणत्याही मंडळाशी परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही.
(चार)प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या प्रत्येक बालकास,नियम २३ अन्वये निर्धारित केलेले प्रमाणपत्र देण्यात येईल.
(पाच)विकलांग/विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांच्या अधिनियमाच्या तरतुदींनुसार समावेश करण्यात येईल
(सहा)अधिनियमाच्या कलम २३(१)अन्वये निर्धारित केलेली किमान अर्हता धारण करणा-या शिक्षकांची नियुक्ती करण्यात येईल. परंतु आणखी असे की, अनिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास किमान अर्हता धारण न करणा-या शिक्षकांना अशी किमान अर्हता ५ वर्षाच्या कालावधीत संपादित करावी लागेल.
(सात)अधिनियमाच्या कलम २४(१) मध्ये विनिर्दिष्ट केलेली त्याची /तिची कर्तव्य शिक्षक पार पाडतील,आणि

कृ.मागे पहा....

(आठ)शिक्षकाने/शिक्षिकेने खाजगी शिकवणीच्या कामात स्वतःला गुंतवून घेऊ नये, याची सुनिश्चिती शाळा करील. शाळा समुचित प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या अभ्यासक्रमाच्या आधारे तयार केलेल्या पाठयक्रमाचे पालन करील.

७. शाळा, अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विहित केल्याप्रमाणे शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधांच्या तुलनेत विद्यार्थ्यांना प्रवेश देईल.

८. शाळा अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणकांचे पालन करील मागील तपासणीच्या वेळेत उपलब्ध असलेल्या सुविधा खालील प्रमाणे होत्या:

| | |
|---|---|
| शाळेच्या परिसराचे क्षेत्रफळ | २ एकर |
| एकुण बांधकाम क्षेत्र | १२००० चौ.फुट |
| खेळाच्या मैदानाचे क्षेत्रफळ | ४०००० चौ.फुट |
| वर्गखोल्यांची संख्या | २२ |
| कार्यालय-नि-भांडार-नि-मुख्याध्यापकाची खोली | आहे |
| मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधनगृहे-जेथे वापरण्यासाठी व प्रसाधनगृहे स्वच्छ आणि आरोग्यदायी स्थितीत ठेवण्यासाठी पुरेसे पाणी असेल. | आहे |
| पिण्याच्या पाण्याची सुविधा | आहे |
| दुपारचे जेवण शिजविण्यासाठी स्वयंपाकघर | लागू नाही |
| अध्यापन अध्ययन साहित्य/खेळ व क्रीडाविषयक सामग्री/ग्रंथालय यांची उपलब्धता | आहे |
| वाचन साहित्य विनायासास उपलब्ध. | आहे |

९. मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकडया,शाळेच्या नावाने शाळेच्या परिसरात किंवा इतरत्र चालविता येणार नाहीत.

१०. शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम किंवा क्रीडांगण हे केवळ शिक्षणाच्या व कौशल्य विकासासच्या प्रयोजनार्थ वपरण्यात येतील.

११. शाळा, सोसायटी नोंदणी अधिनियम, १८६० (१८६० चा २१) किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० अन्वये नोंदणी झालेल्या संस्थेमार्फत चालविण्यात येत आहे.

१२. शाळा कोणत्याही व्यक्तीच्या,गटाच्या किंवा व्यक्तीसंघाच्या वा इतर कोणत्याही व्यक्तीच्या फायद्याकरिता किंवा कोणताही नफा मिळविण्यासाठी चालविण्यात येत नाही.

१३. शाळेचे लेखे सनदी लेखापालाकडून लेखापरिक्षित व प्रमाणित करुन घ्यावेत आणि नियमानुसार योग्य लेखा विवरणपत्रे तयार करावीत. प्रत्येक लेखा विवरणपत्राची एक प्रत दरवर्षी जिल्हा शिक्षणाधिका-यांकडे पाठविण्यात यावी.

१४. तुमच्या शाळेला मिळालेल्या मान्यता संकेतांक (27191000162 )असा आहे, हा या कार्यालयाशी कोणताही पत्रव्यवहार करताना कृपया तो नमूद करावा, याची नोंद घ्यावी.

१५. शिक्षण संचालक/ जिल्हा शिक्षणाधिकारी वेळोवेळी मागणी करतील असे अहवाल व माहिती शाळेने सादर करावी किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तीची निरंतर पूर्तता करण्यासाठी किंवा शाळेच्या कामकाजातील त्रुटी दूर करण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकरण देईल अशा सूचनांचे पालन करावे.

१६. संस्थेची नोंदणी कोणतेही असल्यास नूतणीकरण केल्याची सुनिश्चिती करावी.

१७. जोडपत्र "तीन" नुसार इतर शर्ती या सोबत जोडल्या आहेत.

१८. संस्थेने शाळा परवानगीसाठी मागली केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण, इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणी शाळा परवानगी दिलेली आहे. त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

१९. तसेच संदर्भ क्रं.०३ वरील शासन निर्णयामधील व संदर्भ क्रं.०४ वरील मा.शिक्षण उपसंचालक यांचे पत्रामधील नमुद अटी व शर्ती सुध्दा लागु राहतील.

(डॉ. बी. बी. चव्हाण)
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद औरंगाबाद

**प्रतिलिपी :-**

१. मा.शिक्षण संचालक,महाराष्ट्र राज्य,पूणे-१ यांना माहितीस्तव सादर.

२. मा.शिक्षण उपसंचालक,औरंगाबाद विभाग,औरंगाबाद यांना माहितीस्तव सादर.

(डॉ. बी. बी. चव्हाण)
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद औरंगाबाद

## Translation Copy of RTE Certificate

## Form Two (3:1 Permission)

OutNo./ZPA/Education/PE-3/2021-22/1465
Office of the Zilla Parishad, Aurangabad
Date- 13/08/2021

**Administrator: President/Secretary,**
**Pearl Education & Welfare Society, Aurangabad sanchlit**
**Pyramid International School, Gut No. 233, Hersul, Dist. Aurangabad.**

| | |
|---|---|
| Sub: | **Grant of Recognition Certificate as per U/s 18 of Right to free and compulsory education for Children Act, 2009, Rule 12 sub rule (4) of Right to free and compulsory education for children rules, 2011 and rule 3:1 of Secondary school code.** |
| Ref: | **1) Govt. Sanction Order Mis-1909/CR.No.431/PE-3, Mantralaya, Mumbai-32, Date- 20 October 2009.**<br>**2) Maharashtra Self Financed Schools (Establishment and Regulation) Act 2012.**<br>**3) Govt of Maharashtra G.R. No. SFS-1019/CR No.1084/SM-2, Mantralaya, Mumbai – 32, Dated 20/09/2019.**<br>**4) Dy. Director of Education, Aurangabad Order No. DyDE/Selffi/MCN/SE-1/2020-21/673, Dated 29/01/2021.**<br>**5) President/Secretary, Pearl Education and Welfare Society, Aurangabad Proposal**<br>**6) DEO, P.S. Aurangabad inspection report** |

Hon'ble,

As per Correspondence with the school in respect of your application and subsequent correspondence based on the school's Inspection report, I Education officer (Primary), Zilla Parishad, Aurangabad, gives grant of recognition as per sub rule (4) of Rule 12 of the Right to free and compulsory education for children rule, 2011 to **Pearl Education & Welfare Society, Aurangabad sanchlit Pyramid International School, Gut No. 233, Hersul, Dist. Aurangabad. English Medium New School (Std. 1st to 12th)** from academic year **2019-20,** to the **Std. 1st to 8th**, till **31st March 2022.**

**The above recognition is given under terms and conditions:**

1) School shall compliance articles under Right to Free and compulsory education for children act, 2009 (Annexure One) and Maharashtra Right to Free and compulsory education for children rules, 2011 (Annexure Two).
2) The school will admit children from the nearest weaker section and disadvantaged group up to a minimum of 25% of the number of students in the first class. They will be provided free and compulsory education till the completion of primary education but in case of pre-primary education also this standard will be complied with.
3) As specified in paragraph 3 for the children, the school will be given a separate bank account for fulfillment as per section 12 (2) of the Act.
4) The institution / school will not charge any capitation fee and Neither the child nor their parents or guardians will be required for any scrutiny
5) No child will be denied admission to school due to lack of age, religion, caste or ethnicity, place of birth or any of these reasons.
6) (One) No child admitted to the school shall be detained in the same class as he / she is in or shall not be expelled from the school till the completion of primary education.

   (Two) No child shall be subjected to torture or to cruel, inhuman or degrading treatment or punishment.

   (Three) No child will be required to pass any board examination until completion of primary education.

   (Four) Each child who completes elementary education will be given a certificate prescribed under Rule 23.

   (Five) Students with disabilities / special needs will be included as per the provisions of the Act.

(Six) A teacher holding the minimum educational qualification prescribed under section 23 (1) of the Act shall be appointed. However, teachers who do not meet the minimum qualification on the date of commencement of the Act will have to acquire such minimum qualification within a period of 5 years.

(Seven) The teacher shall perform his / her duties specified in section 24 (1) of the Act.

(Eight) The school will ensure that the teacher is not involved in private tutoring activities. The school will follow the syllabus prepared on the basis of the syllabus prescribed by the appropriate authority.

7) The school shall admit the students as compared to the facilities available in the school as prescribed in section 19 of the Act.

8) The school shall comply with the standards and norms specified in Article 19 of the Act.

**The facilities available at the time of the previous inspection were as follows.**

| | |
|---|---|
| Area of the school premises. | 2 Acres |
| Total construction area | 12000 Sq.ft. |
| Area of Play ground | 40000 Sq.ft. |
| No of Class rooms | 22 |
| Office-n-Store room-n-H.M. room | Yes |
| Separate toilet for boys and girls where there will be enough water to use and keep the toilet clean and healthy. | Yes |
| Drinking water facilities | Yes |
| Kitchen for cooking lunch | NA |
| Availability of Teaching Materials / Sports and Sports Materials / Library. | Yes |
| Reading material availability. | Yes |

9) Unauthorized classes or units may not be conducted on or around the school premises in the name of the school.

10) The school building or other construction or playground will be used for educational and skill development purposes only.

11) The school is run by an organization registered under the Societies Registration Act, 1860 (21 of 1860) or the Bombay Public Trusts Act, 1950.

12) The school is not run for the benefit of any individual, group or individual or any other person or for any profit.

13) The school accounts should be audited and certified by a chartered accountant and appropriate account statements should be prepared as per the rules. One copy of each account statement should be sent to the District Education Officer every year.

14) The accreditation number of your school is **(271910000162)**, Please note that this should be mentioned in any correspondence with this office.

15) The school should submit the report and information as requested by the Director of Education / District Education Officer from time to time or follow the instructions given by the government or local authority to continuously meet the conditions of school accreditation or to rectify the errors in the functioning of the school.

16) The registration of the organization should be renewed if any.

17) Other terms are attached herewith as per appendix "three".

18) No changes will be made in the future to the medium, school location, etc. requested by the organization for school permission. If the school is started in a place other than the place where the government has given permission, the permission given by the government will be considered as revocation automatically.

19) Also in the ruling on reference no.3 and reference no. 4 above Hon. The terms and conditions mentioned in the letter of the Deputy Director of Education will also apply.

**Sd/-**
**(Dr. B.B. Chavan)**
**Education Officer (Primary)**
**Zilla Parishad, Aurangabad.**

...ctor of Education (Primary), Directorates of Education, Pune-1.
... Director of Education, Aurangabad Division, Aurangabad.

ATTESTED BY
24-5-2022
ARIF S. SHAIKH
(M.COM, LL.B., D.T.L.)
Advocate & Notary (Govt.of India)
Reg. No. 3026/2005. Dist. Aurangabad.
24 MAY 2022